# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०२५/७६/७४७
दूरध्वनी: ०२२-२६६७७५५५
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : 29 APR 2025

**प्रति,**
मा.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा/नगर पंचायती,
विशेष नियोजन प्राधिकरणे, (एम.आय.डी.सी./सिडको/पीएमआरडीए/मिहान, इत्यादी).
शासकीय/निमशासकीय संस्था यांच्या मार्फत कार्यान्वित अग्निशमन सेवा,
मुख्य अग्निशमन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायती.
अन्य अग्निशमन सेवांचे प्रमुख.

विषय : महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीमध्ये प्रतिवर्षी आग सुरक्षा निधीतील ५% रक्कम जमा करण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-२००९/प्र.क्र.२३०/नवि-२०, दिनांक १२ मार्च,२०१०.

***महोदय,***

शासन निर्णय शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-२००९/प्र.क्र.२३०/नवि-२०, दिनांक १२.०३.२०१० (प्रत सोबत जोडली आहे) अन्वये राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद / नगरपंचायती, राज्य शासकीय उपक्रम उदा.सिडको / एमआयडीसी / पीएमआरडीए, विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच शासकीय/निमशासकीय संस्था यांच्या मार्फत कार्यान्वित अग्निशमन सेवेत कार्यरत अग्निशमन अधिकारी / कर्मचारी यांना आपले कर्तव्य बजावताना मृत्यू अथवा गंभीर शारीरिक इजा / विकलांगता (कायम स्वरुपी आणि अंशतः) आल्यास सानुग्रह अनुदान म्हणून मदत देण्यासाठी शासनाने **महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीची** स्थापना केली आहे. त्याकरीता महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ च्या कलम २५ अन्वये स्थापन केलेल्या आग सुरक्षा निधीमध्ये जमा होणा-या एकूण रकमेच्या ५% रक्कम प्रतिवर्षी महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीमध्ये जमा करावयाचा आहे.

०२. सदर कल्याण निधीची नोंदणी धर्मदाय आयुक्तांकडे करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. या निधीच्या व्यवस्थापकीय समितीच्या दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे सन २०२४-२५ या वित्तीय वर्षामध्ये सर्व **अग्निशमन सेवांकडे जमा झालेल्या एकूण आग सुरक्षा निधीच्या ५% रक्कम महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीमध्ये जमा करावयाचा आहे.**

०३. **महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीमधून नियमीत अग्निशमन सेवेतील** अधिकारी व कर्मचारी यांना मिळण्याकरीता आपल्या **अग्निशमन सेवेतील कार्यरत व नियमीत** अधिकारी व कर्मचारी यांची नांवे, पदनाम, सेवेत रुजू झाल्याची तारीख व सेवानिवृत्तीची तारीख याबाबतचा तपशील खालील नमुन्यामध्ये तात्काळ या संचालनालयास तात्काळ सादर करावी.

२/-

| अ.क्र. | **अग्निशमन** अधिकारी व कर्मचारी यांचे नाव | पदनाम | नियुक्तीची तारीख | सेवानिवृत्तीची तारीख |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

०४. आपणांस विनंती करण्यात येत आहे की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ / (सुधारणा) अधिनियम,२०२३ च्या कलम २५ अन्वये स्थापन केलेल्या आग सुरक्षा निधीमध्ये सन २०२४-२५ मध्ये एकूण किती रक्कम जमा झाली याबाबतची माहिती खालील नमुन्यामध्ये देण्यात यावी.

| अ.क्र. | वर्ष | दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०३.२०२५ पर्यंत जमा झालेला एकूण आग सुरक्षा निधी | जमा रकमेच्या ५% येणारी रक्कम |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

०५. आग सुरक्षा निधीमध्ये जमा रकमेच्या ५% रक्कम **महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीमध्ये** खाली माहिती दिलेल्या बँक खात्यामध्ये NEFT / RTGS द्वारे किंवा धनादेशाने जमा तात्काळ जमा करण्यात यावी.

| Name of Account | **Maharashtra Agnishaman Seva Kalyan Nidhi** |
|---|---|
| Account Number | 049922010002243 |
| Name of Bank | Union Bank of India |
| Name of Branch | Santacruz (East) Branch |
| IFSC Code | UBIN0904996 |

०६. महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीची रक्कम जमा केल्यानंतर UTR नंबरसह कल्याण निधी जमा केल्याचा तपशील या संचालनालयास accountant@mahafireservice.gov.in / supdt@mahafireservice.gov.in या ईमेलवर कळविण्यात यावा.

DIRECTORATE MAHARASHTRA FIRE SERVICES * GOVERNMENT OF MAHARASHTRA * सत्यमेव जयते

आपला विश्वासू

वारीक 20/08/25

**(एस.एस.वारीक)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

सहपत्र : वरीलप्रमाणे.

**अग्निशमन दलातील कर्मचा-यांना आपत्कालिन मदत / अर्थसहाय्य करणेबाबत.**
**महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधी स्थापन करणे.**

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- अशस-२००९/प्र.क्र.२३०/नवि-२०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १२ मार्च, २०१०

**प्रस्तावना:-**

राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका, राज्य शासकीय उपक्रम उदा. सिडको / एमआयडीसी, विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच शासकीय / निमशासकीय संस्था यांच्या मार्फत कार्यान्वित अग्निशमन सेवेत कार्यरत अग्निशमन अधिकारी / कर्मचारी यांना आपले कर्तव्य बजावतांना मृत्यु अथवा गंभीर शारीरिक ईजा / विकलांगता (कायम स्वरुपी आणि अंशत:) आल्यास सानुग्रह अनुदान म्हणून मदत देण्यासाठी **महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधी** स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता. याबाबत सर्वंकष विचार करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील महानगरपालिका / नगरपालिका, राज्य शासकीय उपक्रम उदा. सिडको / एमआयडीसी, विशेष नियोजन प्राधिकरणे तसेच शासकीय / निमशासकीय संस्था यांच्या मार्फत कार्यान्वित अग्निशमन सेवेत कार्यरत अग्निशमन अधिकारी / कर्मचारी यांना आपले कर्तव्य बजावताना मृत्यु अथवा गंभीर शारीरिक ईजा / विकलांगता (कायम स्वरुपी आणि अंशत:) आल्यास सानुग्रह अनुदान म्हणून मदत देण्यासाठी "महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधी" स्थापन करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

०२. सदर निधीची विश्वस्त नोंदणी अधिनियमांतर्गत संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदणी करावी.

०३. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम २५ अन्वये स्थापन केलेल्या अग्निसुरक्षा निधीमध्ये जमा होणा-या एकूण रकमेच्या ५% तरतूद प्रतिवर्षी राज्यस्तरावर स्थापन होणा-या "महाराष्ट्र अग्निसुरक्षा सेवा कल्याण निधी" मध्ये जमा करावी.

सदर निधीत देणगीदारांकडून देणग्या स्विकारण्याची ही मुभा असेल.

०४. महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधी यांचे खाते राष्ट्रीयकृत बँकेमध्ये उघडावे व त्याचे संचलन, संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांचेमार्फत करण्यांत यावे.

०५. या निधीची लेखा तपासणी महालेखापाल किंवा सनदी लेखापाल यांच्याकडून करण्यात यावी.

०६. महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीतून सानुग्रह अनुदान मंजूर करण्यासंबंधी निकष परिशिष्ट-अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( के. व्ही. कुरुंदकर )
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र : परिशिष्ट - "अ"

प्रति,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
११. संचलाक, लेखा व कोषागरे, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई
१२. आयुक्त, सर्व महानगरपालिका
१३. संचालक तथा अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, द्वारा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, (अग्निशमन विभाग) उद्योग सारथी, २ रा मजला, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
१४. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१५. मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगर पंचायती
१६. नगर विकास विभागातील सर्व अधिकारी
१७. कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (वेबसाईटसाठी)
१८. निवडनस्ती (नवि-२०)

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांकः- अशस-२००९/प्र.क.२३०/नवि-२०, दिनांक : १२ मार्च, २०१० चे सहपत्र

## परिशिष्ट "अ"

## महाराष्ट्र अग्निशमन सेवा कल्याण निधीतून सानुग्रह अनुदान देण्यासंबंधी निकष

१. अग्निशमन अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांचा कर्तव्य बजावताना मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना रु. १०.०० लाख. मात्र सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

२. कर्तव्य बजावतांना अग्निशमन अधिकारी / कर्मचारी कोमा (Coma) मध्ये गेल्यास अथवा अतिशय गंभीररित्या जखमी झाल्यास किंवा त्याचा अवयव कायमस्वरुपी निकामी झाल्यास त्याच्या कुटुंबियांना रु. ५.०० लाख. मात्र सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील.

३. विकलांगतेची टक्केवारी किती आहे, याबाबत शासनाने मान्य केलेले सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. त,सेच ही विकलांगता सर्वसामान्य विकलांगतेचे मापदंड न लावता संबंधीत अधिकारी / कर्मचारी पुढे अग्निशमन सेवेत काम करण्यास सक्षम आहे किंवा कसे हे लक्षात घेऊन विकलांगता निश्चित करण्यांत यावी.

४. सानुग्रह अनुदान मंजूर करण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना राहतील. त्याकरिता ते आपल्या स्तरावर समिती गठीत करु शकतील.
प्रत्येक प्रकरणी सानुग्रह अनुदान मंजूर केल्यानंतर संचालकांनी त्याविषयी शासनास अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

------------------